राष्ट्रीय शिक्षा नीति (एनईपी-2020) की तीसरी वर्षगांठ

Celebrating 3rd Anniversary on National Education Policy (NEP -2020)

एनईपी-2020 पत्रकार भवन नागपुर में पत्रकार सम्मेलन का आयोजन 18 जुलाई, 2023 को किया गया।

Press Conference on NEP -2020 at Press Club Nagpur July 18, 2023



सकाळ

sakal19-07-2023 page no. 8

## आयआयआयटी नागपूर येथे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी

नागपूर : इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी (आयआयआयटी) नागपूर २०२० मध्ये सुरू केलेल्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा तिसरा वर्धापन दिन साजरा करीत असून, धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी विविध उपक्रम व अभ्यासक्रम सुरू केले असून, याचा असंख्य विद्यार्थ्यांना फायदा झाल्याची माहिती, सहयोगी अधिष्ठाता डॉ. मयूर पराते व अन्य मान्यवरांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत दिली. डॉ. पराते म्हणाले, तीन वर्षांपूर्वी धोरणाची अंमलबजावणी केल्यानंतर विद्यार्थ्यांसाठी आम्ही अनेक उपक्रम आयोजित केले आहेत. सुरुवातीला धोरणाचे महत्व, उच्च व तांत्रिक संस्थांमध्ये त्याचा उपयोग समजावून देण्यासाठी दोन वेबिनार घेण्यात आले. यादरम्यान स्किल डेव्हलपमेंटवर प्रामुख्याने भर देण्यात आला. पदवीधर, पदव्युत्तर व डॉक्टरेट विद्यार्थ्यांसाठी क्रेडिट ट्रान्सफर स्कीम, नागपूर विभागातील दोन अभियांत्रिकी महाविद्यालयांमधील संगणक विज्ञान आणि अभियांत्रिकी, इलेट्रॉनिक्स व कम्युनिकेशन अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांसाठी क्रेडिट हस्तांतरण योजनांसह अनेक उपक्रम, अभ्यासक्रम व योजना राबविण्यात आल्या व येताहेत. याचा फायदा आतापर्यंत अनेक विद्यार्थ्यांनी घेतल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. पत्रकार परिषदेला डॉ. तौसिफ दिवाण, डॉ. कीर्ती दोरशेटवार, डॉ. जगदीश चकोले व डॉ. तपनकुमार जैन उपस्थित होते. (वा. वा.)

# 'ट्रिपल आयटी'मध्ये संस्कृत, समाजशास्त्राचे धडे मिळणार

## नव्या शिक्षण धोरणास सुरुवात

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

**नागपूर :** इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, नागपूर येथे नव्या शिक्षण धोरणाचा अवलंब करण्यात आला आहे. त्यानुसार आता ट्रिपल आयटीच्या विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी शिक्षणासह नवीन शैक्षणिक धोरणानुसार संस्कृत, समाजशास्त्रे, पर्यावरण विज्ञान आदी विषयांचेही शिक्षण दिले जाणार असल्याची माहिती इलेक्ट्रॉनिक्स आणि कम्युनिकेशन इंजिनियरिंग विभागाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. मयूर पराते यांनी पत्रकार परिषदेत दिली.

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, नागपूर येथे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या विविधांगी अंमलबजावणीला प्रारंभ झाला आहे. नव्या शैक्षणिक धोरणाअंतर्गत विविध उपक्रमांची अंमलबजावणी ट्रिपल आयटीमध्ये सुरू करण्यात आली आहे. भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाच्या निर्देशानुसार ट्रिपल आयटीने 'क्रेडिट ट्रान्सफर' करणे सुरू केले आहे. नव्या धोरणाचे महत्त्व आणि उच्च आणि तंत्रशिक्षण संस्थामध्ये त्याचा योग्य उपयोग समजून घेण्यासाठी दोन चर्चासत्रही संस्थेच्यावतीने आयोजित करण्यात आले होते. याशिवाय तीन नव्या अभ्यासक्रमांना देखील प्रारंभ करण्यात आला आहे. नव्या शिक्षण धोरणानुसार संस्कृत, समाजशास्त्रे, पर्यावरण विज्ञान अशा विविध विषयांचाही समावेश अभ्यासक्रमामध्ये केला आहे. शैक्षणिक क्रेडिट बँक, राष्ट्रीय शैक्षणिक फ्रेमवर्क, सापेक्ष ग्रेडिंग अशा नव्या शिक्षण धोरणातील बाबींचा स्वीकार ट्रिपल आयटीने केला असल्याची माहिती डॉ. मयूर पराते यांनी पत्रपरिषदेत दिली.

लोकसत्ता Wed, 19 July 2023
https://epaper.loksatta.com/c/72

# 'ट्रिपल आयटी'मध्ये संस्कृत, समाजशास्त्राचे धडे मिळणार

## नव्या शिक्षण धोरणास सुरुवात

लोकसत्ता खास प्रतिनिधी

**नागपूर :** इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, नागपूर येथे नव्या शिक्षण धोरणाचा अवलंब करण्यात आला आहे. त्यानुसार आता ट्रिपल आयटीच्या विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी शिक्षणासह नवीन शैक्षणिक धोरणानुसार संस्कृत, समाजशास्त्रे, पर्यावरण विज्ञान आदी विषयांचेही शिक्षण दिले जाणार असल्याची माहिती इलेक्ट्रॉनिक्स आणि कम्युनिकेशन इंजिनियरिंग विभागाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. मयूर पराते यांनी पत्रकार परिषदेत दिली.

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, नागपूर येथे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या विविधांगी अंमलबजावणीला प्रारंभ झाला आहे. नव्या शैक्षणिक धोरणाअंतर्गत विविध उपक्रमांची अंमलबजावणी ट्रिपल आयटीमध्ये सुरू करण्यात आली आहे. भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाच्या निर्देशानुसार ट्रिपल आयटीने 'क्रेडिट ट्रान्सफर' करणे सुरू केले आहे. नव्या धोरणाचे महत्त्व आणि उच्च आणि तंत्रशिक्षण संस्थामध्ये त्याचा योग्य उपयोग समजून घेण्यासाठी दोन चर्चासत्रही संस्थेच्यावतीने आयोजित करण्यात आले होते. याशिवाय तीन नव्या अभ्यासक्रमांना देखील प्रारंभ करण्यात आला आहे. नव्या शिक्षण धोरणानुसार संस्कृत, समाजशास्त्रे, पर्यावरण विज्ञान अशा विविध विषयांचाही समावेश अभ्यासक्रमामध्ये केला आहे. शैक्षणिक क्रेडिट बँक, राष्ट्रीय शैक्षणिक फ्रेमवर्क, सापेक्ष ग्रेडिंग अशा नव्या शिक्षण धोरणातील बाबींचा स्वीकार ट्रिपल आयटीने केला असल्याची माहिती डॉ. मयूर पराते यांनी पत्रपरिषदेत दिली.

लोकसत्ता Wed, 19 July 2023
https://epaper.loksatta.com/c/72

नवभारत

# IIIT : 3 नये बीटेक पाठ्यक्रम शुरू
# PG के लिए मल्टीपल एंट्री एग्जिट

■ नागपुर, महानगर संवाददाता. भारतीय सूचना प्रौद्योगिकी संस्थान नागपुर वर्तमान में राष्ट्रीय शिक्षा नीति-2020 की तीसरी वर्षगांठ मना रहा है. शिक्षा मंत्रालय के निर्देशों के अनुरूप एनईपी के प्रभावी कार्यान्वयन को सुनिश्चित करने के लिए विभिन्न गतिविधियों पहल की हैं. दो वेबिनार आयोजित किये गये. सहयोगी अधिष्ठाता मयूर पराते ने पत्रकारों को बताया कि स्नातक, स्नातकोत्तर और डॉक्टरेट छात्रों के लिए एमओओसी/चयनित ऑनलाइन प्लेटफ़ॉर्म पाठ्यक्रमों के लिए क्रेडिट ट्रांसफर योजना की शुरुआत की है. छात्र इन ऑनलाइन पाठ्यक्रमों को पूरा कर सकते हैं और इन प्लेटफार्म पर उनके परीक्षा स्कोर को उनके अंतिम ग्रेड में माना जाता है. संस्थान ने स्नातकोत्तर पाठ्यक्रमों के लिए मल्टीपल एंट्री एग्जिट सिस्टम (एमईईएस) भी अपनाया है.



सितंबर 2022 में, मध्य प्रदेश के महू में एमसीटीई के 40 छात्रों ने पीजी-डिप्लोमा कार्यक्रम में दाखिला लिया और उसके बाद आईसीटी में एम.टेक किया. इसके अलावा, मई 2023 में, मध्य प्रदेश के महू में एमसीटीई से अतिरिक्त 25 छात्रों ने एम.टेक के अगले बैच में दाखिला लिया. एमसीटीई से कुल 50 छात्र शामिल थे और चौथे बैच में 62 छात्र शामिल थे, जिन्होंने आईसीटी में पीजी डिप्लोमा के लिए पंजीकरण कराया था. उन्नत तकनीकी कौशल के विकास को बढ़ावा देने के लिए, आईआईआईटी ने हाल ही में तीन नए बी.टेक. कार्यक्रम पेश किए हैं. कंप्यूटर साइंस एंड इंजीनियरिंग (सीएसई) आर्टिफिशियल इंटेलिजेंस एंड मशीन लर्निंग (एआई एंड एमएल), डेटा साइंस एवं एनालिटिक्स (डीएसए) और ह्यूमन-कंप्यूटर इंटरेक्शन एंड गेम टेक्नोलॉजी (एचसीआई एंड जीटी) का समावेश हैं. इसके अतिरिक्त, एक नया बी.टेक. इंटरनेट ऑफ थिंग्स में विशेषज्ञता के साथ इलेक्ट्रॉनिक्स और संचार इंजीनियरिंग में कार्यक्रम शुरू किया गया है. पत्र परिषद में सीएसई विभाग प्रमुख तौसीफ दीवान, विभागाध्यक्ष कीर्ति दोरसेटवार आदि उपस्थित थे.

Nagpur Edition
19-july-2023 Page No. 5
epaper.enavabharat.com

नवराष्ट्र

शिक्षण ● राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची (एनईपी) प्रभावी अंमलबजावणी

# लष्करी उमेदवारांचे ट्रिपल आयटीतून एम.टेक.

**नागपूर.** इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इन्फर्मेशन टेक्नोलॉजी नागपूर (आयआयआयटीएन) संस्थेकडून गेल्या 3 वर्षांपासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची (एनईपी) प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे. त्याअंतर्गत प्रगत तांत्रिक कौशल्यांच्या विकासाला चालना दिली जात आहे. सोबतच संस्थेने पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी 'मल्टी-एंट्री-मल्टी-एक्झिट' प्रणाली स्वीकारली असून त्याअंतर्गत महू येथील मिलिटरी कॉलोज ऑफ टेलिकम्युनिकेशनचे विद्यार्थी एम.टेक.चे शिक्षण घेत आहेत. ट्रिप्पल आयटीचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. मयूर पराते यांनी आज पत्रकारपरिषदेतून संस्थेकडू सुरू असलेल्या एनईपीच्या अंमलबजावणीसंदर्भात विस्तृत माहिती दिली.

## विविध अभ्यासक्रम

ट्रिप्पल आयटीतर्फे अलीकडेच 3 नवीन बी.टेक. अभ्यासक्रम सुरू केले आहेत. कंप्यूटर सायनस ॲण्ड इंजीनियरिंग (सीएसई), आर्टिफिशियल इंटेलिजेंस ॲण्ड मशीन लर्निंग (एआई ॲण्ड एमएल), डेटा सायंस ॲण्ड एनालिटिक्स (डीएसए), तसेच ह्यूमन-कंप्यूटर इंटरेक्शन ॲण्ड गेम टेक्नोलॉजी (एचसीआई ॲण्ड जीटी) यांचा त्यात समावेश आहे. शिवाय, नवीन बी.टेक. इंटरनेट ऑफ थिंग्ज (आयओटी) स्पेशलायझेशनसह इलेक्ट्रॉनिक्स आणि कम्युनिकेशन इंजिनिअरिंग (ईसीई) मध्ये अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. ऑनलाइन एक्झिक्युटिव्हमध्ये एम.टेक. सुरू करण्याचा प्रस्ताव आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्स ॲण्ड डेटा सायन्स (एआई ॲण्ड डीएस), सायबर सिक्युरिटी, सॉफ्टवेअर इंजिनीअरिंग, क्लाउड कंप्युटिंग आणि वीएलएसआई यांसारख्या क्षेत्रातील प्रोग्राम्स, मल्टी-एंट्री-मल्टी-एक्झिट प्रणाली समाविष्ट आहे. संस्कृत, सामाजिक विज्ञान, मानविकी, पर्यावरण विज्ञान, अभियांत्रिकी अर्थशास्त्र यासारख्या विविध विषयांचा समावेश ट्रिप्पल आयटीने अभ्यासक्रमात केला आहे.

संस्थेने शैक्षणिक बँक क्रेडीट (एबीसी) लागू केले असून राष्ट्रीय शैक्षणिक फ्रेमवर्क (एनएएफ) स्वीकारले आहे. त्यात ' एनईपी कॉन्क्लेव्ह 2021' आणि 'एनईपी ऑनलाइन वेबिनार मालिका 2022' विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त सिद्ध होत आहे. महू येथील एमसीटीईच्या 40 विद्यार्थ्यांनी 2022 मध्ये एम.टेक.चा पीजी डिप्लोमा केला. 2023 च्या बॅचमध्ये २५ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. सध्या या संस्थेतील 50 विद्यार्थ्यांची तिसरी बॅच व आयसीटीमधील पीजी डिप्लोमासाठी 62 विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. संस्थेने शहरातील काही अभियांत्रिकी महाविद्यालयांशीही करार केला आहे. आयआयआयटी, नागपूरच्या विद्यार्थ्यांना इंटर्नशीप व ऑनलाईन क्रेडीटमुळे मोठ्या प्रमाणात प्लेसमेंटचा फायदा मिळत असल्याचे पराते यांनी सांगितले. पत्रकार परिषदेला सीएसई विभाग प्रमुख तौसीफ दीवान, विभागाध्यक्ष कीर्ती दोरशेटवार उपस्थित होते.

लोकमत

संस्थेत एनईपीची अंमलबजावणी

# ट्रिपल आयटीमध्ये सैन्य सेवेच्या विद्यार्थ्यांचे एम.टेक

लोकमत न्यूज नेटवर्क

**नागपूर** : नागपूरच्या इंडियन इन्स्टिट्युट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी (आयआयआयटी) संस्थेत राष्ट्रीय शिक्षण धोरण (एनईपी) २०२० ची तीन वर्षांपासून अंमलबजावणी केली जात आहे. यानुसार, संस्थेत डिफेन्स सेवेच्या अनेक अधिकाऱ्यांनी एम.टेक डिप्लोमा कोर्स पूर्ण केला, तर शेकडो विद्यार्थ्यांना धोरणाचा लाभ घेत, अभ्यासक्रम पूर्ण केले.

ट्रिपल आयटी नागपूरचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. मयूर पराते यांनी मंगळवारी पत्रपरिषदेत अंमलबजावणीविषयी माहिती दिली. संस्थेने या काळात 'एनईपी कॉन्क्लेव २०२१' आणि 'एनईपी ऑनलाइन वेबिनार मालिका २०२२' चे आयोजन केले. अभ्यासक्रमात ऑनलाइन प्लॅटफार्म उपलब्ध केले. संस्थेने शैक्षणिक बँक क्रेडिट (एबीसी) लागू केली व राष्ट्रीय शैक्षणिक फ्रेमवर्क (एनएएफ) स्वीकारले आहे. क्रेडिट ट्रान्सफर योजना सुरू केल्याने, मल्टी-एंट्री-मल्टी-एग्झिट सीस्टिमद्वारे बाह्य विद्यार्थ्यांना आयआयआयटीत शिक्षणाचा लाभ मिळत आहे. यामुळे मध्य प्रदेशातील महूस्थित डिफेन्स कॉलेज एमसीटीईच्या ४० विद्यार्थ्यांनी २०२२ मध्ये एम.टेकचा पीजी डिप्लोमा केला. २०२३ बॅचमध्ये २५ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. आयआयआयटी, नागपूरच्या विद्यार्थ्यांना इंटर्नशिप व ऑनलाइन क्रेडिटमुळे मोठ्या प्रमाणात प्लेसमेंटचा फायदा मिळत असल्याचे डॉ.पराते यांनी सांगितले. यावेळी सीएसई विभागप्रमुख डॉ.तौसीफ दीवान, विभागाध्यक्ष डॉ.कीर्ती दोरशेतवार आदी उपस्थित होते.

Nagpur Main
Page No. 5 Jul 19, 2023
Powered by: erelego.com

संस्थेत एनईपीची अंमलबजावणी

# ट्रिपल आयटीमध्ये सैन्य सेवेच्या विद्यार्थ्यांचे एम.टेक

लोकमत न्यूज नेटवर्क

नागपूर : नागपूरच्या इंडियन इन्स्टिट्युट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी (आयआयआयटी) संस्थेत राष्ट्रीय शिक्षण धोरण (एनईपी) २०२० ची तीन वर्षांपासून अंमलबजावणी केली जात आहे. यानुसार, संस्थेत डिफेन्स सेवेच्या अनेक अधिकाऱ्यांनी एम.टेक डिप्लोमा कोर्स पूर्ण केला, तर शेकडो विद्यार्थ्यांना धोरणाचा लाभ घेत, अभ्यासक्रम पूर्ण केले.

ट्रिपल आयटी नागपूरचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. मयूर पराते यांनी मंगळवारी पत्रपरिषदेत अंमलबजावणीविषयी माहिती दिली. संस्थेने या काळात 'एनईपी कॉन्क्लेव २०२१' आणि 'एनईपी ऑनलाइन वेबिनार मालिका २०२२' चे आयोजन केले. अभ्यासक्रमात ऑनलाइन प्लॅटफार्म उपलब्ध केले. संस्थेने शैक्षणिक बँक क्रेडिट (एबीसी) लागू केली व राष्ट्रीय शैक्षणिक फ्रेमवर्क (एनएएफ) स्वीकारले आहे. क्रेडिट ट्रान्सफर योजना सुरू केल्याने, मल्टी-एंट्री-मल्टी-एग्झिट सीस्टिमद्वारे बाह्य विद्यार्थ्यांना आयआयआयटीत शिक्षणाचा लाभ मिळत आहे. यामुळे मध्य प्रदेशातील महुस्थित डिफेन्स कॉलेज एमसीटीईच्या ४० विद्यार्थ्यांनी २०२२ मध्ये एम.टेकचा पीजी डिप्लोमा केला. २०२३ बॅचमध्ये २५ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. आयआयआयटी, नागपूरच्या विद्यार्थ्यांना इंटर्नशिप व ऑनलाइन क्रेडिटमुळे मोठ्या प्रमाणात प्लेसमेंटचा फायदा मिळत असल्याचे डॉ.पराते यांनी सांगितले. यावेळी सीएसई विभागप्रमुख डॉ.तौसीफ दीवान, विभागाध्यक्ष डॉ.कीर्ती दोरशेतवार आदी उपस्थित होते.

# ट्रिपल आईटी में संस्कृत और समाजशास्त्र पढ़ाया जाएगा

## ▪ नई शिक्षा नीति के तहत शुरु किया उपक्रम

**भास्कर प्रतिनिधि** | नागपुर. इंडियन इंस्टीट्यूट ऑफ इंफॉर्मेशन टेक्नोलॉजी (ट्रिपल आईटी) नागपुर में नई शिक्षा नीति को लागू कर दिया गया है। अब संस्थान में विद्यार्थी इंजीनियरिंग के साथ ही संस्कृत, समाजशास्त्र, पर्यावरण विज्ञान जैसे विषय भी पढ़ सकेंगे। मंगलवार को आयोजित पत्रकार परिषद में संस्थान के इलेक्ट्रॉनिक्स व कम्यूनिकेशन इंजीनियरिंग विभाग के सहयोगी अधिष्ठाता डॉ. मयूर पराते ने यह जानकारी दी। उन्होंने बताया कि भारत सरकार के शिक्षा मंत्रालय के निर्देशानुसार संस्थान ने 'क्रेडिट ट्रांसफर' नीति भी शुरू कर दी है, साथ ही 3 नए पाठ्यक्रम भी शुरू किए गए हैं।

**बताया जाएगा महत्व :** नई शिक्षा नीति के महत्व आसैर उच्च शिक्षा संस्थानों में उसका उपयोग बताने के लिए संस्थान ने दो चर्चा सत्र भी आयोजित किए थे। अब विद्यार्थियों को शैक्षणिक क्रेडिट बैंक, राष्ट्रीय शैक्षणिक फ्रेमवर्क, सापेक्ष ग्रेडिंग के तहत समाविष्ट किया गया है। पत्रकार परिषद में सीएसई विभाग प्रमुख डॉ. तौसिफ दीवान, बीएस विभाग प्रमुख डॉ. कीर्ति दोरशेटवार, नई शिक्षा नीति समन्वयक डॉ. जगदीश चकोले और जनसंपर्क अधिकारी तपन कुमार जैन उपस्थित थे।